नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धी न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - १५९ | Issue - 159 | वार बुधवार दि. २९ ऑक्टोबर २०२५ | Blow- Wednesday Date 29 October 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# अतिवृष्टीग्रस्तांसाठी आणखी ११००० कोटी

## १५ दिवसांत खात्यात जमा होणार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील अतिवृष्टीग्रस्तांसाठी जाहीर करण्यात आलेल्या मदत पॅकेजचा राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंगळवारी आढावा घेण्यात आला. अतिवृष्टीग्रस्तांसाठी आधी आठ हजार कोटी रुपये वितरित करण्यात आले असून, आणखी ११ हजार कोटी रुपये वितरित करण्यास या बैठकीत मान्यता देण्यात आली. जवळपास ४० लाख शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे पोहोचले आहेत. अतिरिक्त पैसे पुढच्या १५ दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

अतिवृष्टीग्रस्तांसाठीच्या मदत पॅकेजचा आढावा घेतल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, 'याआधी वितरित केलेले पैसे सुमारे ४० लाख शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले आहेत. अतिवृष्टीग्रस्तांना आणखी ११ हजार कोटी रुपये देण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. पुढच्या १५ दिवसांत हे पैसे खात्यात जमा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

वेगवेगळ्या जिल्ह्यांत हा निधी वेगवेगळ्या पद्धतीने गेला आहे. जशा याद्या येतील तशी मान्यता द्यायची असा निर्णय झाला आहे. काही ठिकाणी 'एनडीआरएफ'ची मदत मिळाली, पण १० हजार मिळाले नाहीत असे झाले आहे. काही ठिकाणी १० हजार मिळाले, काही ठिकाणी दोन हेक्टरचे मिळाले आहेत. आता तीन हेक्टरचेही पैसे टाकतो आहोत.

येत्या १५-२० दिवसांत ९० टक्के शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा होतील. उर्वरित १० टक्के राहतील, कारण काहींच्या नोंदी, बँक खात्यात अडचणी आहेत. त्या अडचणीही सोडवू. निधीची कोणतीही कमतरता नाही. प्रक्रिया पूर्ण करताना याद्या दोन वेळा तपासाव्या लागतात. कारण कोणीही पात्र शेतकरी राहून जाऊ नये आणि अपात्र असलेल्याला मदत मिळू नये ही अपेक्षा असते. ग्रीस्टॅक खात्यांची आपण ई-केवायसी करत नाही.'

शेतमालाच्या खरेदीसाठी राज्यात नोंदणी सुरू केली जात असून, यासाठी नोंदणी करण्याचे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. अशा नोंदणीमुळे पारदर्शकता आली असून, आता शेतकऱ्यांना हमीभाव मिळत आहे.

# आठव्या वेतन आयोगाच्या संदर्भ अटींना मंजुरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आठव्या वेतन आयोगाच्या संदर्भ अटींना मंजुरी दिली आहे. आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेपासून १८ महिन्यात शिफारशी केंद्र सरकारला सादर कराव्या लागणार आहेत. आठवा वेतन आयोग लागू झाल्यास याचा ५० लाख केंद्रीय कर्मचारी आणि ६९ लाख पेन्शनधारकांना फायदा होईल. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी यासंदर्भात माहिती दिली.

आठवा केंद्रीय वेतन आयोग ही तात्पुरती संस्था आहे. या आयोगाला एक अध्यक्ष असेल, एक सदस्य (अर्धवेळ) आणि एक सदस्य सचिव असेल. या आयोगाची स्थापना जेव्हा होईल त्या तारखेपासून १८ महिन्यात शिफारशी सादर कराव्या लागतील. जर आवश्यकता असेल तेव्हा अंतिम शिफारशी सादर केल्यानंतर एखाद्या बाबीवर अंतरिम रिपोर्ट देखील द्यावा लागेल.



आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशी सादर करताना अध्यक्ष, सदस्य, सचिव यांना देशातील आर्थिक स्थिती आणि वित्तीय विवेकाची गरज, विकासात्मक खर्च आणि कल्याणकारी उपाययोजना राबवण्यासाठी पुरेशी संसाधने आहेत का याची खात्री करण्याच गरज, योगदान न देणाऱ्या निवृत्तीवेतन योजनांचा विनाअनुदानित खर्ज, आठवा वेतन आयोग काही शिफारशींसह जी राज्य सरकारं स्वीकारतील त्यांच्या आर्थिक स्थिती जो परिणाम होऊ शकतो त्याचा विचार करणं. केंद्राच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आणि खासगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध असलेली सध्याची वेतन रचना, फायदे आणि कामाची परिस्थिती याचा विचार करावा लागेल. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आठव्या केंद्रीय वेतन आयोगाची रचना, टर्म्स ऑफ रेफरन्स, आयोगाच्या कामाचा कालावधी या गोष्टींना मान्यता दिल्याची माहिती दिली. हा खूप महत्त्वाचा निर्णय आहे, असं अश्विनी वैष्णव म्हणाले. आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशींचा फायदा ५० लाख केंद्रीय कर्मचारी आणि ६९ लाख पेन्शनधारकांना होईल, असं अश्विनी वैष्णव म्हणाले.

सुप्रीम कोर्टाच्या माजी न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई या आठव्या वेतन आयोगाच्या अध्यक्ष असतील. आयआयएम बंगळुरुच्या प्राध्यापक पलक घोष या सदस्य (अर्धवेळ) असतील. तर, पेट्रोलियम आणि नॅचुरल गॅस विभागाचे सचिव पकंज जैन हे सदस्य सचिव असतील.

दरम्यान, केंद्र सरकारनं आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशी स्वीकारल्यानंतर तो १ जानेवारी २०२६ पासून लागू होऊ शकतो. तर, आयोगाच्या स्थापनेला मंजुरी केंद्रानं जानेवारी महिन्यात दिली होती.

# निवडणुका महायुतीतच लढायच्या ही भूमिका ठेवा, एकनाथ शिंदे यांचे शिवसेनेच्या मंत्र्यांना आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : राज्यात आगामी काळात महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांसदर्भात शिवसेना पक्षाचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे (एज्ञपरींह डहळपवश) यांनी पक्षाच्या मंत्र्यांची बैठक घेतली. या बैठकीत एकनाथ शिंदे यांनी सर्व मंत्र्यांना स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका महायुतीत लढवायच्या असल्याचं सांगितलं. शिवसेनेच्या बैठकीला संजय शिरसाट, प्रताप सरनाईक, उदय सामंत, शंभूराज देसाई, भरत गोगावले, योगेश कदम, गुलाबराव पाटील, प्रकाश अबिटकर हे मंत्री उपस्थित आहेत. शिवसेनेच्या मंत्र्यांची बैठक मंत्र्यांचं प्रगती पुस्तक तपासण्यासाठी आयोजित करण्यात आली होती.

एकनाथ शिंदे यांनी गेल्या महिन्यात सर्व मंत्र्यांशी वन टू वन चर्चा करून त्यांना जबाबदाऱ्या दिल्या होत्या. मंत्र्यांना दिलेल्या मतदारसंघात फिरून स्थानिक स्वराज्य संस्थांची तयारी करण्याचे दिले काम एकनाथ शिंदे यांनी दिलं होतं. शिवसेनेचे मंत्री कोणकोणते मंत्री दिलेल्या मतदारसंघात फिरले, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची किती तयारी केली, पक्ष संघटनेसाठी काय काय केले याची माहिती घेण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

निवडणुका महायुती म्हणून लढायच्या

शिवसेनेच्या मंत्र्यांची बैठक नंदनवन या शासकीय निवासस्थानी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत एकनाथ शिंदे यांनी सर्व मंत्र्यांना निवडणुका महायुतीतच लढायच्या ही भूमिका ठेवण्याचे आदेश दिले. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका आहेत त्यात महानगरपालिका देखील महायुतीमध्ये आपल्याला लढायच्या आहेत,असं एकनाथ शिंदे म्हणाले.

अगदीच जिथे काही जुळून येत नसेल तिथे शेवटचा पर्याय म्हणून मैत्री पूर्ण लढत करू, अन्यथा सर्वत्र महायुतीच निवडणूक लढवू अशी भूमिका एकनाथ शिंदे यांनी घेतली. एकनाथ शिंदे यांनी निवडणुका महायुतीत लढवण्याचा संदेश सर्व मंत्र्यांना नंदनवन या निवासस्थानी झालेल्या बैठकीत दिले. या बैठकीत एकनाथ शिंदे यांनी सर्वांना एकत्रित मार्गदर्शन केले तसेच प्रत्येक मंत्र्याला दिलेल्या जबाबदारीचा आढावा घेतला.

दरम्यान, एकनाथ शिंदे यांनी नुकताच नवी दिल्लीचा दौरा केला होता. त्या दौऱ्यात एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. एकनाथ शिंदे नवी दिल्लीत असतानाच शिवसेनेतील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार मुंबई महापालिका निवडणुकीत समसमान जागा लढवण्यासाठी आग्रही असल्याचं सांगण्यात आलं होतं. मुंबई महापालिकेत महायुतीचा भगवा फडकवण्यासाठी एकनाथ शिंदेंची शिवसेना किती जागांवर लढणार हे पाहावं लागणार आहे. मुंबई महापालिकेच्या २२७ जागांपैकी महायुतीत कोणाला किती जागा मिळणार हे पाहावं लागेल.

शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी तसेच इतर मागण्यांसाठी बच्चू कडू आक्रमक

सरकारला दिला अल्टीमेटम

# फडणवीसांना सात बारा कोरा करावा लागेल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : बारा तास नाही तर बारा महिने थांबावे लागले तरी परत जाणार नाही. उद्या बारा वाजेपर्यंत मागण्या पूर्ण झाल्या नाहीत तर विमान वाहतूक आणि शेजारुन जाणारी रेल्वे वाहतूकही थांबवू असा इशारा प्रहारचे प्रमुख बच्चू कडू यांनी दिला आहे. आपण किल्ल्यात प्रवेश केला आहे. दडून बसलेल्या फडणवीसांना बाहेर यावेच लागेल आणि सात बारा कोरा करावा लागेल असे बच्चू कडू म्हणाले. ते नागपुरात बोलत होते.

माजी मंत्री बच्चू कडू शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी तसेच इतर मागण्यांसाठी चांगलेच आक्रमक झाले आहेत. सध्या मोठे आंदोलन उभे केले आहे. त्यांचा मोर्चा सध्या नागपुरात पोहोचला आहे. कर्जमाफी करण्यासंदर्भात तत्काळ निर्णय घ्या अन्यथा आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या रामगिरी बंगल्याकडे कूच करू, असा इशारा त्यांनी दिला आहे.

काल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा गेम होता की मुंबईला बोलावून गेम करणार होते. आपण तिथे जायचे नाही, तर सरकारला इथे बोलवायचे असे मत प्रहारचे प्रमुख बच्चू कडू यांनी व्यक्त केले. पैसे खिशात नसताना शेतकरी ट्रॅक्टर घेऊन आले आहेत. बायकांचे मंगळसूत्र मोडले आणि इथे आल्याचे बच्चू कडू म्हणाले. लढाई सोपी नाही. आले आणि गेले एवढी सोपी ही लढाई नाही असे कडू म्हणाले.





सरकारच्या डोक्यात असे आहे की आपण मोर्चा हाणून पाडू. फक्त कापूस शेतकऱ्यांची अडचण नाही, तर सर्व पिकांच्या उत्पादक शेतकऱ्यांची अडचण आहे. आंदोलन उभे राहणे कठीण असते. एकदा आंदोलन थांबले तर पुढे पुन्हा उभे करणे कठीण असते असे बच्चू कडू म्हणाले. जिल्हा परिषद निवडणुकीची तिकीट मिळाली आणि गावाकडे परतले असे होऊ नये. आज जेवढी संख्या आहे, उद्या यापेक्षा चौपट संख्या असली पाहिजे असे बच्चू कडू म्हणाले.

शक्तीपीठ महामार्ग का करायचाय? मुंबईत एवढे हजारो कोटी खर्च करायची गरज का? मुंबईचे स्वतःचे एवढे बजेट असताना आणखी खर्च का? असे सवाल बच्चू कडू यांनी केले. आणखी किती दिवस सहान करायचे. आता मागे हटायचे नाही असे बच्चू कडू म्हणाले. तुम्हाला त्रास होईल. जेवण पाण्याची अडचण होईल. मात्र ही लढाई एका दिवसाच्या जेवणाची नाही तर आयुष्यभराच्या जेवणाची लढाई आहे. गावाला परत जाऊ नका. एक गेल्याने काय होते असे विचार करुन परत जाऊ नका असे बच्चू कडू म्हणाले.

तुम्ही एवढ्या मोठ्या संख्येने याल अशी अपेक्षा नव्हती, मात्र तुम्ही स्वखर्चाने आले. चारही दिशांनी आले. तुमच्या प्रयत्नांना माझा सलाम असल्याचे कडू म्हणाले. तुम्हाला इथे थांबल्यावर झोपण्यासाठी मागे जावे लागेल, बाजूला बगीचा आहे, मंगल कार्यालय आहे, ते ताब्यात घेऊ. दार तोडावे लागले तर तोडून टाकू. ताब्यात घेऊ ते आपलेच आहे असे बच्चू कडू म्हणाले. आपण किल्ल्यात प्रवेश केला आहे. दडून बसलेला फडणवीसांना यावेच लागेल आणि सात बारा कोरा करावा लागेल असे बच्चू कडू म्हणाले.

काँग्रेस ने पाठिंबा दिला आहे. राष्ट्रवादीने पाठिंबा दिला आहे. उद्या आपल्या गावात फोन करा, उद्या जर संपूर्ण महाराष्ट्र जाम करावा लागला तर प्रत्येक रस्ता जाम केला पाहिजे असे बच्चू कडू म्हणाले. आता हैदराबाद मार्ग जाम झाला आहे. जबलपूर मार्ग जाम झाला आहे. उद्या बारा वाजेपर्यंत मागण्या पूर्ण झाल्या नाहीत तर गरज भासली तर विमान वाहतूक आणि शेजारुन जाणारी रेल्वे वाहतूकही थांबवू असे बच्चू कडू म्हणाले. आम्ही रेल्वे रुळच राहू देणार नाही असा इशारा कडू यांनी दिला.

देवा भाऊच्या घरी जाण्याचे कार्यक्रम आपण आज टाळले आहे. उद्या १२ वाजता थेट रेल्वे थांबवू असा इशारा बच्चू कडू यांनी दिला आहे. पंजाब दिल्लीच्या धर्तीवर आंदोलन होईल. कितीही दिवस लागले तरी चालतील असे कडू म्हणाले. सर्व आंदोलने मुंबईत का करावी? नागपुरात आमचे देवा भाऊ आहेश्र, नितीन भाऊ आहेत, ठडड आहे. भाजपला दया नाही आली तर ठडड ला दया येईल असे बच्चू कडू म्हणाले.

# हैदराबादहून बलून उड्डाण प्रयोग; जळगाव, बीड, नागपूर, सोलापूरसह काही जिल्ह्यांवर उपकरणे पडण्याची शक्यता, नागरिकांना सूचना जारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जळगाव : एका महत्त्वाच्या संशोधनासाठी हैदराबादहून बलून उड्डाणाचा प्रयोग करण्यात येणार असून वाऱ्याच्या दिशेनुसार ही उपकरणे महाराष्ट्रातील जळगाव तसेच मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांमध्ये पडण्याची शक्यता आहे. असं जर झालं तर नागरिकांनी त्याला हात लावू नये किंवा ती हाताळू नये. त्यामुळे महत्त्वाचा डेटा नष्ट होऊ शकतो. तसेच हे बलून आणि त्यातील उपकरणे काही ठिकाणी पडण्याची शक्यता असल्याने नागरिकांना सतर्कतेचे आवाहन करण्यात आलं आहे. जळगावचे जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी यासंबंधी माहिती दिली.

भारत सरकारच्या अणुऊर्जा विभाग आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हैदराबादहून २५ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०२५ दरम्यान सुमारे १० हाय अल्टिट्यूट वैज्ञानिक बलून उड्डाणे करण्यात येणार आहेत. हे उड्डाण टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च आणि ईसीआयएल, हैदराबाद येथील बलून सुविधा केंद्रातून होणार आहे. या प्रयोगांतून महत्त्वाचे अंतराळ संशोधन होणार आहे.

ही बलून उड्डाणे महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने १९५९ पासून केली जात आहेत. बलून हायड्रोजन वायूने भरलेली असून त्यांचा व्यास ५० ते ८५ मीटर इतका असतो. ही बलून ३० ते ४२ किलोमीटर उंचीवर वैज्ञानिक उपकरणे वाहून नेतात आणि प्रयोग पूर्ण झाल्यानंतर रंगीत पॅराशूटच्या सहाय्याने जमिनीवर उतरतात.



वाऱ्याच्या दिशेनुसार ही उपकरणे हैदराबादपासून २०० ते ३५० किलोमीटर अंतरावर पडू शकतात. त्यामुळे महाराष्ट्रातील औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, सांगली, सातारा, अहमदनगर, नागपूर, जळगाव, सोलापूर, चंद्रपूर, वर्धा आणि गडचिरोली या जिल्ह्यांत उपकरणे उतरण्याची शक्यता आहे.

अशी उपकरणे किंवा पॅराशूट आढळल्यास ती उघडू किंवा हाताळू नयेत. काही उपकरणांवर उच्च विद्युत दाब असू शकतो, त्यामुळे त्यांना हाताळल्यास धोका संभवतो. तसेच अशा उपकरणांशी छेडछाड केल्यास मौल्यवान वैज्ञानिक माहिती नष्ट होऊ शकते.

अशा वस्तू आढळल्यास नागरिकांनी जवळचे पोलीस ठाणे, पोस्ट ऑफिस किंवा जिल्हा प्रशासनाशी तात्काळ संपर्क साधावा. तसेच संचालक, बलून सुविधा केंद्र, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च, ईसीआयएल, हैदराबाद येथे फोन किंवा संदेश पाठवावा. उपकरणांची सुरक्षित परतफेड करणाऱ्या नागरिकांना बक्षीस आणि झालेला खर्च परत दिला जाणार आहे. मात्र, छेडछाड झाल्यास बक्षीस दिले जाणार नाही.

स्थानिक प्रशासनाने ही माहिती गावपातळीपर्यंत पोहोचवावी आणि स्थानिक भाषेत जनजागृती करावी. पहिले बलून उड्डाण ऑक्टोबरच्या चौथ्या आठवड्यात होणार असून, सर्व आवश्यक तयारी तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च यांनी दिले आहेत.

## संपादकीय....

### शेतकऱ्यांना दिलासा

राज्यातील अतिवृष्टीग्रस्तांसाठी जाहीर करण्यात आलेल्या मदत पॅकेजचा राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंगळवारी आढावा घेण्यात आला. अतिवृष्टीग्रस्तांसाठी आधी आठ हजार कोटी रुपये वितरित करण्यात आले असून, आणखी ११ हजार कोटी रुपये वितरित करण्यास या बैठकीत मान्यता देण्यात आली. जवळपास ४० लाख शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे पोहोचले आहेत. अतिरिक्त पैसे पुढच्या १५ दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होतील, असा विश्वास नुकताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. अतिवृष्टीग्रस्तांसाठीच्या मदत पॅकेजचा आढावा घेतल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, 'याआधी वितरित केलेले पैसे सुमारे ४० लाख शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले आहेत. अतिवृष्टीग्रस्तांना आणखी ११ हजार कोटी रुपये देण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. पुढच्या १५ दिवसांत हे पैसे खात्यात जमा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. वेगवेगळ्या जिल्ह्यांत हा निधी वेगवेगळ्या पद्धतीने गेला आहे. जशा याद्या येतील तशी मान्यता द्यायची असा निर्णय झाला आहे. काही ठिकाणी 'एनडीआरएफ'ची मदत मिळाली, पण १० हजार मिळाले नाहीत असे झाले आहे. काही ठिकाणी १० हजार मिळाले, काही ठिकाणी दोन हेक्टरचे मिळाले आहेत. आता तीन हेक्टरचेही पैसे टाकतो आहोत. येत्या १५-२० दिवसांत ९० टक्के शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा होतील. उर्वरित १० टक्के राहतील, कारण काहींच्या नोंदी, बँक खात्यात अडचणी आहेत. त्या अडचणीही सोडवू. निधीची कोणतीही कमतरता नाही. प्रक्रिया पूर्ण करताना याद्या दोन वेळा तपासाव्या लागतात.

# शेतकरी चिंतातुर झालाय : धानपिक झोपले, वाहून गेले, धान पडले

## अवकाळी पावसाने धानपीक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचा वाली कोण ?





मुन्नाभाई नंदागवळी बाराभाटी : परिसरात गेल्या दोन तीन दिवसापासून अतिवृष्टी संततधार पावसाने झोडपले. यात मोठ्या प्रमाणावर परिसरातील तालुक्यातील धानपिक हे वाहत गेले. काही ठिकाणी धानपिक झोपले तसेच धानपिक पाण्यात बुडाले आहे. कापणीला आलेले धानपिक याची मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. भरपाई देण्याची मागणी शेतकरी करीत आहेत.

धानपिक झोपले, धानपिक पडले काही ठिकाणी धानपिक वाहत जाऊन पाण्यात सडत आहेत. याकडे लोकप्रतिनिधी तसेच या कृषी विभाग तसेच आपत्ती व्यवस्थापन समिती यांचे लक्ष नसल्याचे दिसून येत आहे. अजूनही शेतकरी बांधवांच्या बांधावर पाय आलेच नाही.

**तात्काळ पंचनामे करा. – शेतकरी**

दोन तीन दिवसांपासून अतिवृष्टी होत असलेल्या भागात धानपिक नुकसान झाले. त. याबरोबरच काही परिसरात घरकुलांची पडझड झाली आहे. अशा दोन्ही आपत्कालीन प्रसंगाची तातडीने पंचनामे करावी. तसेच पैसे सुध्दा लवकरात लवकर त्या लाभार्थ्यांला मिळाले पाहिजे.

**....आता पदाधिकारी गेले कुठे ?**

संततधार पावसाने जोरदार हजेरी लावली. धानाची तसेच घरांची नुकसान झाली आहे. यावेळी उदरनिर्वाह चालणारे शेतातील पिकांची खूप हानी झाली आहे. धानपिक वाहतात. धानपिक झोपले तर कापणीचे धानपिक वाया गेले आहे. अशावेळी परिसरातील, तालुक्यातील व जिल्ह्यातील लोकप्रति निधी व राजकारणी आता नेमके गेले कुठे ? हेच कळत नाही. असे प्रश्न शेतकरी करीत आहेत.

**कोणताच अधिकारी व कर्मचारी आमच्या शेतीकडे फिरकत नाही. धानपिक वाहतो पावसाने, जगावे की मरावे असे प्रश्न निर्माण झाले.**

**– लालचंद मारगाये, शेतकरी बाराभाटी**

### नुकसान भरपाई देऊन सरसकट कर्जमाफी करा.

**सर्व ठिकाणी पावसाचा मोठा जोर वाढला असून अजून पाऊस येणे सुरू आहे. आणखी पावसाचा अंदाज वर्तवला आहे. अशावेळी शेतकरी व सामान्य नागरिकांनी कसे जगावे. धानपिक गेले. हवी असणारे उत्पन्न मिळणार नाही. शेतकरी वर्गाची दिवाळी अंधारात जाण्याची दाट शक्यता आहे. म्हणून नुकसान भरपाई द्यावी व सरसकट कर्जमाफी करावी अशी तातडीची मागणी केली आहे.**

# विश्वप्रणेता डॉ. बाबासाहेब आंबेडकर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

डॉक्टर आंबेडकर आपल्या सहकार्यासमवेत, विशेष करून, एस. एफ बराथे, बी.जे. भोसले; एस बी भंडारे, जे.एस. रणपिसे; डॉ. पी.जी.ह सोळंकी; शिवराम जांबा कांबळे; के एस सोनवणे व रामचंद्र कृष्णाजी कदम,ज्ञबीबी जाधव; जीवाप्पा लिंगप्पा ऐदाळे; एस आर थोरात; के एन कदम; ए. एस कांबळे; के एन सोनकांबळे सोबत होते. या वेळच्या जाहीर सभेत आंबेडकरांनी महार ही शूर व लढवय्ये जमात असल्याचे प्रतिपादन केले होते.

तदनंतर, वीस मार्च १९२७ ला महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह बाबासाहेबांनी सुरू केला होता. पाणी पिण्याचा सत्याग्रह बाबासाहेबांनी केल्याचे इतिहासामध्ये दिसून येते. इतराप्रमाणे आम्हीही माणसे आहोत. हे सिद्ध करण्यासाठी हा सत्याग्रह होता. याचवेळी साहेब आंबेडकरांनी प्रचंड जनसमुदायासमोर अस्पृश्यतेला मान्यता देणाऱ्या, सामाजिक गुलामगिरीचा पुरस्कार करणारा, स्त्री-पुरूष विषमता निर्माण करणाऱ्या, मनुस्मृती या धर्मग्रंथाचे दहन केले होते स्त्री-पुरुष विषमता निर्माण करणाऱ्या 'मनुस्मृती' या धर्मग्रंथाचे दहन केले होते. हा ग्रंथ बाबासाहेबांना मुळीच मान्य नव्हता. या सत्याग्रहात अनंत विनायक चित्रे, वामनराव पत्की; सुभेदार घाडगे; सहस्त्रबुद्धे; समता संघाचे प्रधानबंधु या लोकांनी महाडच्या सत्याग्रहात सहभाग घेतला होता. त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकर मुंबईहून शिवतरकर, धोंडो नारायण गायकवाड; गंगावणे; पुण्याची राजभोज; नाशिकचे भाऊराव गायकवाड; इत्यादी पुढारी बोटीने महाडला आले होते.

याच दरम्यान दिनांक ३ फेब्रुवारी १९२८ ला सायमन कमिशन भारतात आले होते. त्याकाळी लोकांनी त्यांचा निषेध नोंदवला होता. डॉ. बाबासाहेबांनी देखील सहकार्य केले व आपल्या मागण्यांचे निवेदन दिले होते. २३ ऑक्टोबर १९२८ रोजी आंबेडकरांनी आपल्या मागण्या कमिशन पुढे सादर केल्या होत्या अस्पृश्यांना वेगळा स्वतंत्र मतदारसंघ असावा.हअशी पहिली मागणी होतीज्ञ अस्पृश्यांना अधिक राजकीय हक्क देण्यात यावेत असे दुसरी मागणी होती अशा प्रकारचे पहिल्यांदाच अस्पृश्य व दलितांचे प्रश्न स्वतंत्रपणे मांडल्याचे दिसून येते.

यानंतर १५ मार्च १९२९ रोजी 'समता' पाक्षिक प्रकाशित झाल्याचे पण नोंद यांच्या चरित्रात दिसून येते. ९ जून १९२९ रोजी समाज समता संघाची ही स्थापना केल्याचे दिसून येते. दिनांक १३ जून १९२७ रोजी महाडच्या दिवाणी न्यायालयाने १९२७ साली सनातन यांनी केलेल्या दाव्याचा निकाल न्यायाधीश व्ही व्ही पंडित यांनी अस्पृश्यांच्या बाजूने दिला या निकालामुळे महाडचे चवदार तळे अस्पृश्यांसाठी खुले झाले.

मुख्य म्हणजे, अस्पृश्यांसाठी सवर्ण हिंदूंच्या बरोबरीने माणुसकीचे हक्क आणि समतेची वागणूक मिळावी. यासाठी तीन मार्च १९३० रोजी नाशिक येथे काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह सुरू केला. पहिल्या तुकडीत १२५ पुरुष आणि २५ स्त्रिया होत्या हा सत्याग्रह डॉक्टर बाबासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली भाऊराव गायकवाड; अमृतराव रणखांबे; अनंतराव गद्रे इत्यादी स्थानिक नेत्यांनी सन १९३५ पर्यंत चालविला होता.

सात सप्टेंबर १९३१ रोजी दुसरी गोलमेज परिषद लंडन येथे भरली होती त्या परिषदेला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते ब्रिटिश पंतप्रधान रॅम्से मॅकडॉनल्ड्स यांच्या अध्यक्षतेखाली ही परिषद होती गांधीजी पंडित मदन मोहन मालवीय बॅरिस्टर एम आर जयकर इत्यादी मान्यवर या परिषदेला हजर होते डॉक्टर बाबासाहेबांनी स्वतंत्र एक मागण्यांचे निवेदन अथवा खलिता सादर केला होता. तोच भारतीय अस्पृश्य चळवळीच्या मूलभूत पाया मानला जातो.

या मागण्यांमध्ये : समान नागरिकत्व; समान हक्काचा निर्वेध उपयोग; भेदभावापासून संरक्षण; कायदे कौन्सिलात पुरेसे प्रतिनिधित्व; सरकारी नोकरीत योग्य प्रमाण; पक्षपातीपणा व हितसंबंधाकडे दुर्लक्ष झाल्यास करावयाची तरतूद; अस्पशांच्या हितसंबंधाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी खास खाते; दुर्लक्ष झाल्यास त्याबाबत करावे करावयाची तरतूद; अस्पृश्यांच्या हितसंबंधाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी खास खाते; अस्पृश्य समाजाला मंत्रिमंडळात थोडेसे प्रतिनिधित्व मिळावे म्हणून निवेदन दिले होते.

**पुणे करार:**

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे जीवनातील पुणेकरार एक अतिशय महत्त्वाची घटना. याप्रसंगी बाबासाहेबांना तडजोड करावी लागली. दुसऱ्या गोलमेज परिषदेत इंग्रजांनी अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्याचे घोषणा केली होती स्वतंत्र मतदार संघामुळे समाज हिंदू समाजापासून दूर जाईल असे वाटल्याने गांधी येणे पुण्यातील येरवडा मध्यवर्ती कारागृहात उपोषण केले दलितांना स्वतंत्र मतदारसंघाची मागणी सोडावी म्हणून डॉक्टर आंबेडकरांचे व गांधीजींचे टोकाचे मतभेद झाले. गांधीजींचे प्राण जायची वेळ आली. परंतु बाबासाहेबही यापासून दूर होते त्यामुळे बाबासाहेब आंबेडकरांना आंबेडकरांवर दबाव यायला लागला. तेव्हा आंबेडकर आणि गांधी यांच्यात जो करार झाला या करारानुसार, दलितांनी स्वतंत्र मतदार संघाऐवजी राखीव मतदारसंघ स्वीकारण्याचे मान्य केले. तो पुणे करार म्हणून ओळखला जातो. याप्रसंगी बॅरिस्टर एमआर. जयकर, सर तेजबहादुर सुप्रू, एन. शिवराज, पी जी सोळंकी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पी बाळू व इतर नेते या घटनेत सहभागी होते. ही घटना बाबासाहेबांच्या आयुष्यात तडजोड व एक पाऊल मागे घेणारी ठरली. अशा व इत्यादी अनेक घटनांमुळे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्मात सुधारणा होत नाही हे पाहिल्यानंतर अनेक सत्याग्रह मंदिर प्रवेश यामध्ये दलित समाजाचा वेळ पैसा आणि शक्ती खर्च झाली. परंतु हिंदू धर्मात सुधारणा होईल तेव्हा बाबासाहेबांनी १३ ऑक्टोबर १९३५ ला येवला परिषदेमध्ये धर्मांतराची घोषणा दिली. मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही ज्या हिंदू लिस्ट धर्मलिष्ठांमध्ये जर लाज लज्जा असेल तर माझे धर्मांतर रोखा असे जळजळीत आव्हान केले व ही घोषणा दिली. ही ऐतिहासिक घटना ठरली. बाबासाहेब आंबेडकर तब्बल २१ वर्षापर्यत धर्मांतराच्या भूमिकेवर ठाम राहिले आणि १४ ऑक्टोबर १९५६ ला प्रत्यक्ष धम्मक्रांती घडवून आणली.

२७ मे १९३५ ला रमाईचे देहावसान झाले. रमाबाई एक सुविद्य पत्नी असल्याने घरदार सांभाळून घरातले सर्व काम शिस्तीत व येणाऱ्या अतिथी व पाहुणचार करणे दररोजच्या व्यवहारात नम्रतेने बोलणे व वागणे या गोष्टी त्या करत असून त्या कडक उपवास करीत असत.ज्ञ राजरत्नच्या मृत्यूनंतर रमाबाईची प्रकृती ढासळत गेली. तेव्हा लक्ष्मीबाईंनी घराचा सर्व बोजा उचलला. त्यानंतर रमाबाई महिलेच्या महिले अंथरुणाला खेळून राहिल्या रमाबाई ह्या साहेबांच्या मित्रासमोर येत नसत त्या त्यांच्याशी धारा आणून बोलत असत ज्या दिवशी बाबासाहेब जेवत नसत त्या दिवशी रमाबाई सुद्धा जेवत नसत पुढे पाचसात वर्षे त्यांना ताप येऊ लागला आणि त्यातूनच त्या उठल्या नाहीत. हा प्रसंग कष्टाळू, कर्तव्यनिष्ठ, आणि श्रद्धाळू पत्नीला मुकावे लागले. ही घटना दुर्दैवाने बाबासाहेबांना सहन करावा लागली.

वास्तविक पाहता, या घटनांच्या मालिकेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर गव्हर्नमेंट लॉ कॉलेजचे प्राचार्य देखील झाले होते. सन १९२८ ला त्यांना गव्हर्नमेंट लॉ कॉलेजचे प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली होती. त्यानंतर त्याच कॉलेजमध्ये ते एक जून १९३५ ला प्राचार्य म्हणून नेमणूक झाली. असे वाचनात येते.

येवला येथे धर्मांतर घोषणाच्या भूमिकानंतर बाबासाहेब आंबेडकरांनी ३१ मे १९३६ ला मुक्ती कोन पदे ? या ऐतिहासिक भाषणाचा जन्म झाला त्यात हिंदू देवदेवता पूजाअर्चा व्रतवैकल्य मंदिरे यावर अस्पृश्यांनी बाहेर घालावा असे ठराव व आशय यातून झाला होता व धर्मांतर का व कशासाठी या सर्व घटनांचा ओवापो या भाषणांमधून बाबासाहेबांनी केला होता.

तदनंतर डॉ आंबेडकरांनी २७ जुलै १९४२ ला मजूर पंतप्रधानची जबाबदारी स्वीकारली लगेचच सात व आठ ऑगस्टला १९४२ रोजी त्यांचे अध्यक्षतेखाली मालक कामगार व सरकार यांचे प्रतिनिधी असलेली त्रिपक्षीय मजूर परिषद दिल्ली येथे भरली. व्ही व्ही गिरी नाम जोशी जमनादास मेहता यासारख्या कामगार नेत्यांनी या परिषदेत भाग घेतला डॉक्टर आंबेडकर यांनी या परिषदेत नीड ऑफ युनिफॉर्मिटी इन लेबर लेजिस्लेशन या विषयावर बीजभाषण केले असून त्यांच्या सोबत जबनादास मेहता, ना.म. जोशी द्वारकानाथ प्रधान इत्यादी सोबत होते.

याच काळात बाबासाहेबांची जल ऊर्जा क्षेत्रावरची पाच मुख्य भाषणे हे ऐतिहासिक ठरले असून हाच देशाच्या शाश्वत विकासाचा एजंडा बनला आहे. मजूर मंत्री असताना बाबासाहेब आंबेडकर खान कामगारांच्या अडचणी ऐकून घेत असत त्याचप्रमाणे कामगारांच्या अनेक मागण्या त्याने ब्रिटिशांच्या अधिकाऱ्यांसमोर नेले आहेत निवारा शिक्षण सांस्कृतिक आणि आरोग्याची साधने याविषयी कामगारांच्या बांगड्या त्याचप्रमाणे बारमाही कामगारांना भरपगारी रजा आणि आठ तासाचा दिवस हा मजूर मंत्री आंबेडकरांनी कामगार वर्गाच्या क्षेत्रात दिलेल्या अतिशय महत्त्वाच्या देणगी आहेत. या पार्श्वभूमीवरच आंबेडकरांनी मजूर मंत्री म्हणून नऊ डिसेंबर १९४३ रोजी धनबाद बिहार येथील खान कामगारांच्या वसाहतीला भेट दिली होती. २३ ऑगस्ट १९४४ ला आंबेडकर देशात प्रथमच सुरू केलेल्या कलकत्ता येथील सेवा योजना कार्यालयालाही आवर्जून भेट दिली या भेटी प्रसंगी भारत सरकारचे सचिव एस लाल आणि बंगाल कामगार आयुक्त ये ह्यूज व द्वारकानाथ प्रधान उपस्थित होते.

सन १९४६ साली डॉक्टर बाबासाहेब यांनी मुंबईत पीपल्स एज्युकेशन सोसायटी सुरू केली होती या संस्थेच्या अंतर्गत सिद्धार्थ महाविद्यालय मरीन लाईन येथील बराके येथे भरत असे सन १९४६ ला डॉक्टर आंबेडकर यांनी या महाविद्यालयाला भेट दिली. पीपल्स एज्युकेशन सोसायटी एक आदर्श शिक्षण संस्था म्हणून पुढे आली. या संस्थेच्या माध्यमातून दलित मागासलेल्या व आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणाला वंचित झालेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाचा लाभ घेता यावा म्हणून ८ जुलै १९४५ रोजी डॉक्टर बाबासाहेबांनी पीपल्स एज्युकेशनची संस्था स्थापन केल्याचे आढळून येते. भारत सरकारकडून ३०० रुपयांची देणगी आणि तीन लाख रुपयाचे कर्ज घेऊन त्यांनी त्वरित कामाला सुरुवात केली. २०जून १९४६ रोजी त्यांनी पहिले महाविद्यालय सुरू केले या महाविद्यालयाचा ला गौतम बुद्ध यांचे सिद्धार्थ हे नावलौकिक दिले अल्पावधीतच महाविद्यालयांमध्ये ११६३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला त्यामध्ये अस्पृश्य वर्गाचे ६० विद्यार्थी होते. पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या एकूण मुंबईत सात, औरंगाबादला सहा, महाडला एक, दापोलीस दोन छात्रालये, पंढरपूर आणि नांदेड येथे प्रत्येकी एक वस्तीगृह आणि पुणे व बेंगलोर मिळून एकूण ३४ शिक्षण संस्था कार्यरत आहेत.

विशेष म्हणजे डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या अथक परिश्रमाने अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या दोन तुकड्या ब्रिटनमध्ये शिक्षणासाठी पाठविल्या होत्या. सन १९४६ ला डॉ. आंबेडकर लंडनला गेले असता. एका तुकडीतील विद्यार्थ्यांनी त्यांची भेट घेतली. त्यामध्ये कलोटि, रणदेवसिंग चौधरी रे, पि के कयाळ, एस.ए कांबळे, एस व्ही गायकवाड, एम आर बोबडे, एनजी. उके, एम एन वानखेडे, डी एस जेजुरीकर, टीबी आवळे, एल आर बेहरा, वाय सी गायकवाड, श्रीधर मल्हारी ठिगळे, ए आर कयाळ, व्ही.बी. कदम आणि बि.डी. खोब्रागडे हे होते.

३ फेब्रुवारी १९४६ ला डॉक्टर आंबेडकर दिल्ली येथील गांधी मैदानावर एक परिषद आयोजित केली होती त्यात ब्रिटिश सरकारतर्फे भारतीय समोर मांडलेल्या क्रिप्स योजना यावर चर्चा घडवून आली होती या परिषदेत क्रिप्स योजनेचा निषेध करण्यात आला या परिषदेला जाताना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व सर तेज बहादूर सप्रू होते.

डॉ. बाबासाहेब १९४२-१९४६ च्या दरम्यान व्हाईसरॉय वेवेल यांच्या मंत्रिमंडळात असताना ते मजूर मंत्री म्हणून त्यांची भूमिका व जबाबदारी अतिशय उल्लेखनीय व प्रेरणादायी ठरली आहे. त्यांनी केलेल्या कार्यात आजच्या शाश्वत विकासाची उद्दिष्टे दडलेली आहेत. आज जागतिक स्तरावर ही शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी जल ऊर्जा क्षेत्र जमिनीचे राष्ट्रीयकरण शेती कामगार इत्यादी क्षेत्रात केलेले कार्य ठष्टाशीत पणे पुढे आले आहे. वेवेल यांच्या मंत्रिमंडळात असताना डॉक्टर बाबासाहेबांनी त्यांच्या कारकिर्दीत खान पोर्ट ट्रस्ट रेल्वे जल ऊर्जा क्षेत्र इत्यादी खात्यातील मजुरांच्या हितासाठी अधिनियम करून त्यांची स्थिती सुधारली अस्पृश्यांसाठी केंद्र सरकारमध्ये पाच ते सहा टक्के आरक्षण केले एवढेच नव्हे तर बेकार कामगार आणि कारकून वर्ग यांच्या नोकऱ्यांसाठी रोजगार कार्यालय स्थापन केले दामोदर व्हाली धरणाचा प्रकल्पही सिद्धीस नेऊन दाखवला. भारत मंत्री डॉक्टर प्रतिक लॉरेन्स भारत भेटीच्या दौऱ्यावर असताना व्हाईसरॉय लॉर्ड वेवेल व त्यांचे सहकारी मंडळ यांचे २४ मार्च १९४६ रोजी चर्चा केली आहे. यामध्ये व्हॉईसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिल मधील सभासद म्हणून बाबासाहेबांचे कार्य व जबाबदारीठसठशीतपणे देशाच्या इतिहासात लिहिले गेले.

दिनांक २४-२५ ऑगस्ट १९४६ रोजी एन. शिवराज यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे ऑल इंडिया शेड्युल कास्ट फेडरेशनची कार्यकारी बैठक झाली होती. त्यात राजाभाऊ भोळे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, एन. शिवराज, जोगेंद्र नाथ मंडल, के. सुबय्या, इतर पा.ना. राजभोज, दादासाहेब गायकवाड इत्यादी बैठकीला उपस्थित होते.

१५ ऑगस्ट १९४७ ला यावेळी भारत स्वतंत्र झाला त्यावेळी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मंत्रिमंडळ पहिल्या मंत्रिमंडळामध्ये मंत्र्यांची नावे जाहीर झाली त्यात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना प्रामुख्याने मंत्री म्हणून मंत्री निवड झाली होती डॉक्टर आंबेडकरांकडे कायदा खाते सोपवले होते भारताचे गव्हर्नर जनरल लॉर्ड माऊंटबॅटन यांच्यासह नेहरू मंत्रिमंडळातील सदस्याची निवड झाले. त्यात जॉन मथाई, रफी अहमद किडवाई, सरदार बलदेव सिंग, पंडित जवाहरलाल नेहरू, लॉर्ड माऊंटबॅटन, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना अब्दुल कलाम आझाद, जगजीवन, राजकुमारी अमृत कौर, षण्मुगम चेट्टी, जय रामदास दौलतराम, के सी नियोगी, डॉक्टर श्यामाप्रसाद मुखर्जी; डॉ. बाबासाहेब आंबेडकर; न. वि.गाडगीळ; गोपाल स्वामी अय्यंगार; व मोहनलाल सक्सेना हे मंत्रिमंडळात होते.

स्वतंत्र भारत देशाची घटना लिहिण्याचा प्रसंग आला . त्यावेळी घटना लेखन समितीत बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या न्याय हक्कासाठी समिती जाणे अत्यावश्यक मांनले. परंतु शेड्युल कास्ट फेडरेशनचे मुंबई विधिमंडळात सभासद नसल्याने त्यांना बंगाल विधिमंडळातून घटना समितीवर जावे लागले. यासाठी जोगेंद्र नाथ मंडल यांनी सहकार्य केले. पुढे डॉक्टर बाबासाहेबांची घटना लेखन समिती अध्यक्ष म्हणून नेमणूक झाली. ही समिती इतर सात सदस्य होते. त्यात श्री एस एन मुखर्जी; जुगल किशोर खन्ना; केवल कृष्णन; श्री एन माधवराव ; सय्यद सादुल्ला; डॉक्टर आंबेडकर ; अल्लादी कृष्ण स्वामी अय्यर; सर बेनेगल नरसिंहराव हे सभासद होते.

या समितीत असताना बाबासाहेबांनी दिवसाकाठी अठरा ते वीस, तास कार्य मग्न राहून भारताचे संविधान लिहून काढलं. त्यात अनेक चर्चा, संवाद, संपादन, लेखन, इत्यादीत प्रामुख्याने त्यांचा सहभाग होता. दोन वर्ष, अकरा महिने, सतरादिवस राबवून त्यांनी संविधान तयार केलं. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी डॉक्टर बाबासाहेबांनी घटना समितीच्या वतीने डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांना ती घटना सुपूर्द केली. याचवेळी घटना समितीचे मूल्यमापन अनेक सदस्यांनी अभिनंदनपर गौरव उद्गार काढले आहेत लेखन समितीचे अध्यक्षपद डॉक्टर बाबासाहेबांना देऊन ती निवड किती सार्थ होती. हे या भाषणात नमूद केले. घटनेच्या ऐतिहासिक कार्याने डॉ. आंबेडकरांचा देशभर गौरव झाला. देशाच्या राज्यघटनेचे लेखन केल्याबद्दल या ऐतिहासिक कार्याचा उल्लेखनीय दखल घेऊन डॉक्टर आंबेडकरांना मुंबई प्रदेश सेडूकास्ट फेडरेशनच्या वतीने ११ जानेवारी १९५० रोजी मुंबईतील नरे पार्क येथे घटनेची प्रत चांदीच्या करंडा का मधून भेट देण्यात आली होती.

डॉ. बाबासाहेबांनी त्यांच्या जीवनाच्या पूर्वसंध्येला धम्मदीक्षा घेतली. भगवान बुद्धाच्या मूर्ती समोर नतमस्तक झाले. सोबत माई आंबेडकर; शंकरानंद शास्त्री व नानकचंद रत्तू हे होते. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी अशोक विजयादशमीच्या दिवशी नागपूर येथे दीक्षाभूमीवर धर्मांतर सोहळा पार पाडला. सर्वप्रथम सारनाथ येथे धर्मांतर करावे असे ठरले होते. परंतु मुंबई व विदर्भातील मंडळी आपापल्या भागात हा सोळावा अशीही नियोजन केले होते अखेर नागपूरचे वामनराव गोडबोले यांनी नागपूर आणि परिसरातून सर्वात जास्त नागरिकांच्या सह्या घेण्याची मोहीम चालवून तेथेच धर्मांतर सोहळा व्हावा. यासाठी यशस्वी प्रयत्न केले नागपूरात नाग लोकांची वस्ती सर्वाधिक होती नागवंशीय लोक हे बौद्ध धर्मीय होते म्हणून नागपूरला धर्मांतर होणे ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले.

**– डॉ.दत्तात्रय गायकवाड,**
**माजी ग्रंथालय व माहिती अधिकारी;**
**केंद्रीय जल आणि विद्युत संशोधन केंद्र,**
**पुणे ४११०२४**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# सोलापुरात रक्तघटकाचा प्रचंड तुटवडा; रक्तदात्यांनी रक्तदान करण्याचे डॉ. हेडगेवार रक्तपेढीकडून आवाहन

## ऐच्छिक रक्तदात्यांनी रक्तदानासाठी पुढे यावे; सामाजिक संघटनांनाही आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : भारतीय संस्कृतीमधील सर्वांत मोठा सण दिपावलीच्या सुट्ट्या सध्या सुरू आहेत. त्यातच नोकदार, कर्मचारी वर्ग, विद्यार्थी दिवाळी सणामध्ये व्यस्त असल्याने स्वेच्छेने रक्तदान करणारे तसेच रक्तदान शिबीरे यामध्ये घट झाली आहे. त्यामुळे सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील रक्तपेढ्या व रुग्णालयात रक्ताचा तुटवडा जाणवत आहेत. थॅलेसेमियाग्रस्त बालके, डायलिसीस आणि कर्करोग ग्रस्त रूग्ण, गर्भवती महिला व ऑपरेशनसाठी आलेले रूग्ण यांना रक्त व रक्त घटकाची नियमित गरज असते. त्याचबरोबर डेंगी सदृश्य आजाराचे वाढते रूग्ण यामुळे रक्ताची मागणी वाढलेली आहे. अशा परिस्थितीत ऐच्छिक रक्तदात्यांनी पुढे येवून रक्तदान करण्याची गरज निर्माण झाली असताना डॉ. हेडगेवार रक्तपेढीच्या संचालकांनी बैठक घेवून याबाबचा विचार करून सोलापूर शहर जिल्ह्यातील रक्तदाते, शैक्षणिक संस्था, सामाजिक संस्था यांना रक्तदान करण्याचे आवाहन हेडगेवार रक्तपेढीचे अध्यक्ष सतीश मालू आणि संचालक गिरीष दर्बी यांनी केले आहे.


सध्या रक्तपेढीमध्ये एक किंवा दोन दिवस पुरेल इतकेच रक्त शिल्लक आहे. मागणी वाढली परंतु रक्ताचा पुरवठा कमी होत आहे. रक्ताचा तुटवडा असल्याने गुडघा, यकृत, हृदय प्रत्यारोपण सारख्या शस्त्रक्रिया पूर्वनियोजित असते सुट्ट्यामध्ये असे शस्त्रक्रिया नियोजित केले असल्याने रक्ताची गरज अचानकपणे वाढते परंतु सुट्ट्यामध्ये रक्तदाते उपलब्ध होत नसतात आणि रक्तदान शिबीरेही होत नसतात अशा वेळी रक्ताचा पुरवठा होत नाही आणि रक्त तुटवडा निर्माण होतो. अशीच परिस्थितीत दिवाळीत आलेली आहे. सोलापूरमध्ये हॉस्पिटलची संख्या वाढलेली आहे. सोलापूर हे मेडिकल हब झालेले आहे. सोलापूर मध्ये चांगल्या उपचार पध्दती सोई सुविधा उपलब्ध झालेल्या आहेत. त्यामुळे शहर जिल्ह्याच्या




बाहेरून रुग्ण सोलापूरमध्ये उपचारासाठी मोठ्यासंख्येने येत असतात. त्यांना रक्त आणि रक्त घटकांचा पुरवठाही त्याप्रमाणात करणे गरजेचे आहे. म्हणूनच सोलापूर शहर जिल्ह्यातील विविध संस्था, संघटनां, कारखाने, सामाजिक, शैक्षणिक, क्रिडा संघटनांनी तसेच ऐच्छिक रक्तदात्यांनी पुढाकार घेवून रक्तदान शिबीर आयोजित करावे तसेच रक्तदात्यांनी पुढे येवून रक्तदान करावे असे आवाहनही यावेळी सतीश मालू आणि गिरीष दर्बी यांनी केले आहे.

# चेहरा नवा बदल हवा!; वाघाळा पंचायत समिती गणातून संदिप वाघ यांना तरुणांची पसंती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेडराजा तालुक्यातील नागझरी हे गाव दरेगाव गट ग्रामपंचायत मध्ये असून . नागझरी हे गाव पाच सहासे लोक संख्येचे गाव असल्याने . तालुक्यात च नव्हे तर या गावची राजकीय चर्चा जिल्हाभर आहे . कारण या छोट्याशा गाव खेड्यातुन दोन जिल्हा परिषद सदस्य व.महीला व बालकल्याण सभापती पद भुषविले आहे . दरेगाव नागझरी गट ग्रामपंचायत मध्ये सलग दुसऱ्यांदा तरूण चेहरा असल्याने मतदारानी विश्वास टाकुन संदिप वाघ यांना ग्रामपंचायत सदस्य पदावर निवडून दिले व ते विद्यमान सदस्य आहेत.त्यांनी अगदि सातत्याने मतदारांचे त्यांनी तालुका स्तरावर वरील कामे मार्गी लावल्याने .व भाजपा युवा मोर्चा चे तालुका उपाध्यक्ष पद असल्याने तालुक्यातील युवकांशी त्यांचा जनसंपर्क असल्याने.वाघाळा पंचायत समिती गणातील गावातील पक्ष संघटनेच्या माध्यमातून त्यांनी युवकांची फळी निर्माण करत त्यांचा जनसंपर्क वाढविला असल्याने वाघाळा पंचायत गणात दरेगाव. नागझरी.हिवरा गडलींग. वाकद जहागिर डोरवी खैरव बार्लिंगा. तढेगाव.केशव शिवणी.हिवरखेड पर्यंत अनेक गावे वाघाळा पंचायत समिती गणात येत असल्याने त्यांचे जवळीक नाते संबध. सर्कल मधील प्रत्येक गावा मध्ये मित्र परीवार असल्याने संदिप वाघ यांना वाघाळा पंचायत समिती सर्कल मधून उमेदवारी दाखल केल्यानंतर चांगलाच फायदा होऊ शकतो . परंतु भारतीय जनता पार्टीत सक्रीय कार्यक्रता असल्याने पक्षाकडून उमेदवारी मिळते का व व पक्षाने उमेदवारी न दिल्यास.दुसऱ्या पक्षाकडून उमेदवारी घेऊन लढवतील असे अद्याप कळाले नाही . तरुणांच्या व मतदारांच्या वाढत्या पाठींब्यामुळे संदिप वाघ निवडणूक रिंगणात उतरेलच हे मात्र निश्चित.

# इमानदारीने काम केल्यास भ्रष्टाचार न करताही चांगले जीवन जगता येते : अहमद जावेद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलपूर/प्रतिनिधी : शिवशरण पाटील यांचा जीप चालक मालक संघटना ते आमदारपर्यंतचा कामाचा धडाका तसेच त्यांचा जनसंपर्क वाखाणण्याजोगा आहे.त्यांनी आयोजित केलेल्या स्नेहमेळाव्या मुळे तसेच वारंवार सोलापूरला आल्याने मला अधिक ऊर्जा मिळते, असे प्रतिपादन निवृत पोलिस महासंचालक अहमद जावेद यांनी केले.शासकीय सेवेतील कर्मचारी व अधिकाऱ्यांनी प्रामाणिकपणे काम केल्यास भ्रष्टाचार न करताही चांगले जीवन जगता येते,हे त्यांनी आवर्जून सांगितले.

माजी आमदार शिवशरणअण्णा बिराजदार पाटील यांनी आयोजित केलेल्या स्नेहमेळाव्यात अहमद जावेद बोलत होते.




यावेळी व्यासपीठावर शिव व्याख्याते डॉ.शिवरत्न शेटे,ज्येष्ठ पत्रकार अभय दिवाणजी, राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त सौ. आशालता जगताप,माजी विरोधी पक्षनेते रामचंद्र जन्नु,नरेंद्र काळे,शहर भाजपच्या अध्यक्षा रोहिणी तडवळकर सिद्धेश्वर पाटील,रमेश पाटील,गुरुलिंग कन्नुरकर,सुभाष चव्हाण आदी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

प्रारंभी शिवशरण पाटील यांनी सर्वांचे स्वागत करुन दिवाळीनिमित सर्व मंडळी एकत्रित येऊन गप्पागोष्टी व्हाव्यात हाच उद्देश स्नेहमेळाव्याचे असल्याचे सांगितले.

डॉ.शिवरत्न शेटे म्हणाले की, स्नेहमेळाव्यात फराळाच्या मेनूपेक्षा संस्काराचे मेनू फार महत्वाचे आहेत.अहमद जावेद सारखी प्रामाणिक पोलिस अधिकारी वर्गांचे सॉफ्टवेअर आजच्या तरुण पिढीने घेणे गरजेचे आहे असे म्हटले.

अभय दिवाणजी यांनी आपल्या मनोगतात शिवशरण पाटील हे कोणाचेही काम असोत जात पक्ष भेदभाव न करता काम होण्यासाठी प्रयत्न करण्याची त्यांची कला कौतुकास्पद आहे असे म्हटले.

### शिवशरण पाटलांच्या स्नेह मेळाव्यास मान्यवरांची उपस्थिती

या कार्यक्रमात गुरुलिंग कन्नुरकर सुभाष चव्हाण यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन ज्येष्ठ पत्रकार दशरथ वडतीले यांनी केले. तसेच नागेश

> **सोलापूर चे लोक फार प्रेमळ आहेत.मला अजूनही कार्यक्रमांना बोलवितात.व या ठिकाणी आल्यानंतर त्यांचे मिळणारे प्रेम पाहून सेवानिवृत्ती नंतर ही मी काल पर्यंत कमिशनर असल्यासारखे वाटते असे सांगून सोलापूरकरांचे कौतुक केले.**
>
> **– अहमद जावेद**

ढवणे, सौ.सावित्री ढवणे, अशोक मैंदर्गीकर, प्रा.शैलजा पांढरे,ज्येष्ठ नागरिक नागेश कुंभार आदी विविध हिंदी, मराठी व कन्नड गीते सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.

या स्नेहमेळाव्यास पुरुषोत्तम बरडे, विठ्ठल व्हनमारे, शैलेश आमणगी, सिद्धारुढ निंबाळे, सौ.राजेश्वरी भादुले, ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी, शांतकुमार मोरे, सोलापूर जनता बँकेचे अधिकारी श्री जयवंत कोकाटे, गिरीश मंगरूळे, प्रमिला चोरगी, सिद्राम व्हनमोरे, सिद्राम खेडगीकर, बसवराज सोन्नद, लोकसेवा कॉलेज प्राचार्य कुमठेकर, प्रसिद्ध गायक अय्याज, माजी महापौर सुशीला आबुटे, सामाजिक कार्यकर्त्या सुरेखा गोबूर आदी मान्यवर बहुसंख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्वश्री विश्वनाथ आमने,गंगाधर पाटील, प्रा.भांजे आदींनी विशेष परिश्रम घेतले.



# निवेदिका श्वेता हुल्ले यांना पितृशोक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दुःखद! निवेदिका श्वेता हुल्ले यांना पितृषोक सोलापूरच्या प्रसिद्ध निवेदिका श्वेता हुले यांचे वडील लैंगिक विजय मल्लाप्पा हुल्ले वय ७१ वर्षयांचे मंगळवारी सकाळी दीर्घ आजाराने निधन झाले आहे.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सून व दोन नाती असा परिवार आहे.

अंतयात्रा आज मंगळवार दिनांक २८ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी अकरा वाजता राहत्या घरातून निघणार असून लिंगायत स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# मंगळवेढा पोलिसांसाठी प्रेरणा पुरस्कार उपक्रमाचा शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : गुन्हेगारांच्या वाढत्या चालकी समोर ठामपणे उभे असलेल्या मंगळवेढा पोलीस दलाची मनोबल वाढवण्यासाठी एक आगळा-वेगळा उपक्रम राबविण्यात येत आहे जेवढे गुढे उकलतेवढा सत्कार-हे आकर्षक घोषणा वाक्याखाली दैनिक मूळ शिवार या साप्ताहिक दिव्य संचार यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रेरणादायी उपक्रम सुरू झाला आहे या उपक्रम ंतर्गत, मंगळवेढा पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जेव्हा गंभीर अथवा गुंतागुंतीचे गुन्हे उचलून न्यायप्रक्रियेला हातभार लावला, जेव्हा याचा सन्मानचिन्ह प्रशिक्षित पत्र व अभिनंदन सोहळा आयोजित करण्यात येणार आहे उद्दिष्ट स्पष्ट आहे-गुन्हेगारावर आळा आणि पोलिसांचे मनोबल वाढवणे

उद्दिष्ट आणि प्रेरणा स्थानिक




पत्रकारांनी पुढाकार घेत, समाजात पोलिसाबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करावा, तसेच त्यांच्या कार्याची दखल घ्यावी या हेतूने ही संकल्पना साकार झाली आहे अनेकदा गुन्हे मुकाल्यानंतरही पोलिसांची श्रम दुर्लक्षित राहतात त्यांची कौतुक करण्यासाठी हा अभिनव उपक्रम प्रभावी ठरणार आहे.

आणि पोलिस दलाच्या उत्साहात देऊनच मंगळवेढा पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी यांच्या म्हणण्यानुसार, गुणी उकलणे म्हणजे फक्त तपास नाही, तू एक सामाजिक जबाबदारीचा भाग आहे आमच्या कार्याची दखल घेत ली जात नाही ही आमच्यासाठी प्रेरणा मोठी प्रेरणा आहे.

पोलीस कर्माचाऱ्यांनाही सांगितले की या उपक्रमामुळे स्पर्धात्मक भावना निर्माण होऊन तपासात अधिक गांभरी व तत्परता येईल सन्मान सोहळ्याची रूपरेषा, माहे एक नोव्हेंबर २०२५ पासून या अनेक उपक्रमाची सुरुवात होणार असून त्याचा महिनेच्या शेवटी विशेष कार्यक्रम आयोजित केला जाईल त्या महिन्यात सर्वाधिक होणे उकल करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांचा सत्कार व समाजातील विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार व सन्मान समारंभ,

नागरिकांनाही पोलीस पत्रकार संवादातून कायद्याबद्दल जागरूकता दिली जाणार मंगळवेढा मॉडेल ठरणार आदर्श, हो विक्रम केवळ मंगळा पुरता मर्यादित न राहता जिल्ह्यातील इतर ठिकाणी आदर्श ठरेल अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत पत्रकारिता आणि पॉलिशिंग यांचा समन्वय साधणारा हा प्रयत्न जनतेचा पोलीस ही संकल्पना अधिक मजबूत करेल.

# मौजे येडोळा येथे वर्षावास समाप्ती व गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ सपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : मौजे येडोळा ता तुळजापूर येथे वर्षावास निमित्ताने आयोजित बुद्ध वंदना व धम्मदेशना कार्यक्रमाची सांगता करण्यात आली असून या निमित्ताने येथील गुणवंत विद्यार्थी यांचा सत्कार करण्यात आला.

बौद्ध धम्म संस्कारा नुसार आषाढी पौर्णिमा ते अश्विनी पौर्णिमा हा तिन महिन्याचा कालावधी वर्षावासाचा कालावधी म्हणून पाळला जातो या तीन महिन्यांमध्ये बौद्ध बांधवांच्या वतीने बौद्ध धर्म प्रसार आणि प्रचारार्थ बुद्ध वंदना व धम्मदेशना मालिकेचे आयोजन करण्यात येते त्याचाच भाग म्हणून भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा धाराशिव आणि सिद्धार्थ कला व क्रीडा मंडळ येडोळा ता.तुळजापूर येथे वर्षावासाच्या काळात बुद्ध वंदना व धम्मदेशना मालिकेचे आयोजन करण्यात आले होते.या वर्षावासाच्या कार्यक्रमाची सांगता आणि गुणवंत विद्यार्थी धर्मवीर देवानंद लोंढे यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन नुकतच येडोळा करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हाध्यक्ष राजश्रीताई कदम ह्या होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे पर्यटन विभागाचे जेश्रींरह उपाध्यक्ष विश्वासभाऊ पांडागळे, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा सरचिटणीस विजय बनसोडे, ज्ञानेश्वर बनसोडे, रिपाइं (आठवले) नळदुर्ग शहराध्यक्ष मारुती खारवे,माजी सरपंच पद्माकर पाटील, दिनकर पाटील, ग्रा.प सदस्य दिगंबर पाटील रिपाइं (आठवले ) जिल्हा सचिव एस.के.गायकवाड,प्रा.भास्कर वाघमारे आदी उपस्थित होते.

प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध,व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून कम्प्युटर सॉफ्टवेअर इंजिनिअरिंगची पदवी संपादन केल्याबद्दल येथील विद्यार्थी धर्मवीर देवानंद लोंढे यांचा आजी व आई वडीला समवेत उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी एस.के. गायकवाड,विश्वास भाऊ पांडागळे, राजश्री ताई कदम विजय बनसोडे,मारुती खारवे प्रा.भास्कर वाघमारे आदींची आदींची मार्गदर्शनपर भाषणे झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन समता सैनिक दलाचे मल्लिनाथ लोंढे यानी केले तर आभार अमर जेटीथोर यानी केले.

या वेळी रामचंद्र लोंढे, सुरेश लोंढे,अर्जुन लोंढे,मारुती लोंढे, प्रवीण कांबळे,अंकुश लोंढे अमित लोंढे,सुरज लोंढे,भानूदास लोंढे,अंकुल वाघमारे,शंकर भंडारे,गणेश बिराजदार,अकाश झेंडारे, रमेश वाघमारे सह महिला ग्रामस्थ युवा कार्यकर्ते मोठ्या संखेने उपस्थित होते.

**मोफत तपासणी, मोफत औषधं, मोफत उपचार....**

# टिटवाळा परिसरात सुरु झालाय आता आपला दवाखाना....

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टिटवाळा / कल्याण - प्रफुल्ल शेवाळे : राज्यातील शहर आणि ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था अधिकाधिक बळकट करण्यासाठी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरू करण्यात आलेला आहे

मुंबई परिसरात २२७ आणि राज्यभरात ७०० दवाखाने निर्माण झाले आहेत. शहर आणि ग्रामीण भागातील सरकारी दवाखान्यानंचा भार कमी व्हावा आणि आरोग्य यंत्रणा अधिकाधिक बळकट व्हावी या हेतूने आपला दवखाना निर्माण झाला आहे.वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने आपला दवाखाना आता सर्वसामान्य नागरिकांसाठी पूर्णपणे मोफत तपासणी, मोफत उपचार आणि मोफत औषधी करिता खुला आहे.

आपला दवाखाना ही महाराष्ट्र शासनाची एक प्रमुख आरोग्य योजना आहे, ज्याचे पूर्ण नाव हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना असे आहे. ही योजना राज्य सरकारद्वारे चालवली जात आहे , ज्याचा मुख्य उद्देश गरीब आणि दुर्गम भागातील नागरिकांना प्राथमिक आरोग्य सुविधा विनामूल्य उपलब्ध करणे आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये ७०० आरोग्य केंद्रे उभारण्याचे लक्ष्य होतं ते जवळपास पूर्ण झाले आहे. ज्यामुळे सरकारी रुग्णालयांवरील गर्दी कमी होईल आणि छोट्या आजारांसाठी रुग्णांना दूर जाण्याची गरज राहणार नाही.

**योजनेचे उद्देश:**

झोपडपट्टी, ग्रामीण आणि दुर्गम भागातील लोकांना जवळच्या ठिकाणी आरोग्य सेवा पुरवणे.

प्रत्येक २५ ते ३० हजार लोकसंख्येसाठी एक दवाखाना उपलब्ध करणे.

महानगर पालिका आणि शासकीय रुग्णालयांवरील भार कमी करणे आणि प्रवासाचा वेळ व खर्च वाचवणे.

तात्काळ उपचारांसाठी (जसे अपघात किंवा प्रसूती) प्रभावित न होण्याची खात्री.




**उपलब्ध सेवा:**

सामान्य आजार (ताप, सर्दी इ.) साठी ओपीडी सेवा, तसेच एछ्ढ, नेत्ररोग, स्त्रीरोग, बालरोग, त्वचारोग, दंतचिकित्सा आणि फिजिओथेरपी यासारख्या विशेषज्ञांकडून सल्ला या दवाखान्या मध्ये असणार आहे.

इतर सुविधा: रुग्णांची माहिती डिजिटल कार्डद्वारे जतन, ऑनलाइन रेकॉर्ड, औषध वितरण आणि केस पेपरसाठी रांग टाळणे.

प्रत्येक केंद्रात एक डॉक्टर, नर्स, फार्मासिस्ट आणि मदतनीस असतात, जे कंत्राटी आधारावर नेमले जातात.

ही योजना सामान्य नागरिकांसाठी विशेषत: गरीब वर्गासाठी फायदेशीर आहे, ज्यामुळे आरोग्य सेवा अधिक सुलभ होत आहे. अधिक तपशीलासाठी स्थानिक केंद्रात भेट द्या.

आपल्या टिटवाळा परिसरात दसरा च्या दिवशी आपला दवाखाना सुरु झाला आहे.यामध्ये एक चइइड डॉक्टर, २ वैद्यकीय कर्मचारी आणि १ ऑपरेटर असा सध्याचा कर्मचारी वर्ग या ठिकाणी कार्यरत आहे.मांडा टिटवाळा परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी राज्य सरकारच्या या योजनेचा लाभ घ्यावा आणि परिसरातील इतर नागरिकांना सुद्धा सदर सेवेबाबत कळवावे असं आवाहन करण्यात येत आहे. या आपल्या दवाखाना मध्ये येताना मात्र आपलं स्वतःचे आधार कार्ड घेऊन येणे गरजेचं आहे.

सदर दवाखाना श्री धनंजय रमेश सोनकुले यांच्या टिटवाळा रेल्वे स्थानक परिसर मधील राहत्या निवासस्थानी त्यांच्या लोशीलळरश्र गाळ्यात चालू करण्यात आलेला आहे.

तरी सर्व टिटवाळा परिसरामधील फळेगाव, रुंदे, गणेश वाडी, रिजंसी, गायत्री धाम, नारायणनगर, इंदिरानगर, सरनोबतनगर परिसरातील सर्व नागरिकांनी याचा जरूर लाभ घ्यावा.

आपला दवाखाना पत्ता.
बिकानेर स्वीट समोर,
फळेगावं, गणेशवाडी रिक्षा स्टँड जवळ, टिटवाळा - बल्याणी रोड
टिटवाळा रेल्वे स्थानक (पूर्व ).

# पडघा परिसरात अवकाळी पावसामुळे शेती पिकांचे मोठे नुकसान; शेतकरी हतबल

## भात पिकाला कोंब फुटले, ओंब्या झडल्या; नुकसान भरपाईची शेतकऱ्यांची मागणी





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यात अवकाळी पावसाने थैमान घातल्याने शेतकरी हतबल झाला आहे. तालुक्यातील पडघा, खालिंग, वांद्रे , दळेपाडा, सौर, पाच्छापूर, उबरखांड, नेवाडा, खा-तीवली, दहागाव, सारमाल, डोहोळे, भोकरी, कोशिंबी आदी भागात मुसळधार पावसामुळे भातशेती आणि इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

> **मी अपंग शेतकरी असून, आमची आधीच आर्थिक परिस्थिती बिकट आहे. शासनाने फक्त कागदावर पंचनामे न करता तातडीने मदत द्यावी.**
> **– मधुकर पाटील, वांद्रे**

उरलेसुरले भात काढत असतानाच कोसळलेल्या अवकाळी पावसामुळे परिपक्व अवस्थेतील भात पाण्यात भिजला आहे. काही ठिकाणी तर उभ्या पिकालाही कोंब फुटले असून, भाताच्या ओंब्या झडून गेल्या आहेत. परिणामी शेतकऱ्यांच्या मेहनतीचा घाम पाण्यात वाहून गेला आहे.

भिवंडी तालुक्यातील बहुसंख्य शेतकरी भातशेतीवर अवलंबून आहेत. मात्र अवकाळी पावसामुळे भात पिकाचे संपूर्ण नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचा वर्षभराचा उदरनिर्वाह धोक्यात आला आहे. मजुरी आणि बियाण्याचा खर्चही निघत नाही, अशी स्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीत शेतकऱ्यांच्या डोळ्यात अक्षरशः अश्रू तरळले आहेत. महसूल आणि कृषी विभागाने तातडीने पाहणी करून पंचनामे करावेत, अशी मागणी जोर धरू लागली आहे. ठाणे जिल्हाधिकारी तसेच जिल्हा कृषी अधीक्षक यांनी शेतकऱ्यांना जास्तीत जास्त नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी तत्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

> **एक एकर शेतीत पूर्ण पाणी साचले आहे. भाताचे सरले व मोदल भिजले असून खरेदीदारही मिळत नाही. कर्ज घेऊन शेती केली, पण निसर्गाने आमचा घास हिरावून घेतला. शासनाने तत्काळ नुकसान भरपाई द्यावी.**
> **– एकनाथ शेलार, खालिंग**

# मुख्याधिकारी सचिन पाटील यांचा माळशिरस तालुका काँग्रेस कमिटीने केला सन्मान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माळशिरस तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने अध्यक्ष गिरीश प्रभाकर शेटे यांनी अकलूज नगर परिषदेची नूतन मुख्याधिकारी सचिन पाटील यांचा सन्मान केला.

मंगळवारी दिनांक २८ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी सव्वा बारा वाजले च्या सुमारास अकलूज नगर परिषदेची संपन्न झालेल्या सन्मान सोहळ्याप्रसंगी मुख्याधिकारी सचिन पाटील, नॅशनल युनियन बँक बँक्कोर्द एसी एसटी अँड मायनॉरिटी महासंघ दिल्ली अर्थात एनयूबीसीचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष राज्य संपर्क व प्रसिद्ध प्रमुख पत्रकार भाग्यवंत लक्ष्मण नायकुडे युवक नेते यशराज यशवंत शेटे, जिल्हा काँग्रेस कमिटी वरिष्ठ उपाध्यक्ष बाळासाहेब आप्पासाहेब मगर, तालुकाध्यक्ष गिरीश प्रभाकर शेटे, चंद्रशेखर प्रभाकर शेटे, पाक्षिकृत एक सत्तेचे कार्यकारी संपादक विलासनंद विठ्ठल गायकवाड, इत्यादी मान्यवर उपस्थित होते व सन्मान सोहळ्यानंतर अकलूज नगर परिषद हद्दीतून जाणाऱ्या टेंभुर्णी माळशिरस आम रस्त्यावरून जुना एसटी स्टँड चौथी अशोक चौक हम रस्त्यावर असणारे मोठमोठे खड्डे गांधी चौक ते माळशिरस रोडवरील होड्यापर्यंत धोतरता गटार, व महावीर स्तंभ ते नवीन एसटी स्टँड पाठीमागील रस्ता, अकलूज शहरात महिलांसाठी व पुरुषांसाठी स्वच्छतागृह इ,विविध समाय उपयोगी मूलभूत आणि आत्याविषयक सोयी सुविधांची उपलब्ध तातडीने करण्याविषयी काँग्रेस कमिटीच्या वतीने चर्चा घडवून मागणी करण्यात आली.

# पंधरा वर्षांनंतर पुन्हा शाळा भरली; २०१० बॅचचा अविस्मरणीय स्नेहमेळावा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (ता. अक्कलकोट) – काळ कितीही पुढे गेला, तरी बालपण आणि शालेय जीवनाच्या आठवणी मनातून कधीच पुसल्या जात नाहीत. त्याच आठवणींना पुन्हा उजाळा देण्यासाठी वागद-री येथील श्री एस. एस. शेळके प्रशालेच्या २०१० सालच्या बॅचने तब्बल १५ वर्षांनंतर पुन्हा एकत्र येत शाळेच्या प्रांगणात स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात साजरा केला.

या मेळाव्याचे अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक जावळे सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून बसवर-ाज मल्लीनाथ शेळके (चेअरमन) उपस्थित होते शाळेचे सध्याचे मुख्याध्यापक अनिल देशमुख सर ,मठपती सर ,गंवडी सर,कुरे सर,पुजारी सर माजी शिक्षक बागवान सर,प्रधान सर,आंदोडगी सर,यमाजी सर,लंगोटे सर, मलकपा सुत-ार, मुकूंद मदनकेरी, श्रीशेल पोमाजी,चव्हाण सह शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

या निमित्ताने माजी विद्यार्थ्यांकडून शाळेस प्रोजेक्टर भेट देण्यात आला, ज्यामुळे शिक्षक व विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण साधनांचा लाभ मिळणार आहे. या सामाजिक जाणिवेच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक झाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या गोड आठवणींची पाने सर्वांनी उलटली. कुणी वर्गातल्या खोड्या सांगत हसले, तर कुणी शिक्षकांच्या प्रेमळ रागाच्या आठवणींनी डोळ्यांत पाणी आण-ले. त्या बाकावर बसलो होतो, इथे शाळेचा ध्वज फडकवायचो, त्या झाडाखाली टिफिन खात बसायचो – अशा असंख्य क्षणांची उजळणी होत होती.

इतक्या वर्षांनंतर पुन्हा त्या शाळेच्या दारात उभं राहिलं, तेव्हा वाटलं जणू काळ मागे फिरला आहे, असे अनेक माजी विद्यार्थ्यांनी भावना व्यक्त केल्या. शाळेच्या वाटसप ग्रुपमधून केवळ चॅट करणारे सगळे आज समोरासमोर भेटले होते भावनांनी भारलेला तो क्षण साऱ्यांच्या मनात कायमचा कोरला गेला.

कार्यक्रमाचे नियोजन आणि यशस्वी आयोजन माजी विद्या-र्थी – पवन हंचाटे, दिलीप कटकधोंड, अमर मठपती, प्रियंका सोनकवडे,ऐश्वर्या बटगेरी, शिल्पा कलशेट्टी, शिल्पा चाटे, मल्लीनाथ बेळके, बाळू क्यार, शिवलिंग मठपती, लक्ष्मीकांत सुतार, विकास कलबुर्गी, काशीनाथ वार्ग, सैफन नदाफ, दिपक माने, चिदानंद परीट आणि इतर सर्व सहकाऱ्यांनी एकत्रितपणे केले.तसेच या सुंदर सोहळ्याचे सूत्रसंचालन सोमशरण काळे व प्रियांका सोनकवडे यांनी केले

कार्यक्रमाच्या अखेरीस सर्वांनी एकमेकांना पुन्हा भेटण्याचं आश्वासन दिलं – असेच एकत्र येत राहू, आठवणींचं हे सोनेरी नातं कायम जपूया, असं म्हणत भावनिक वातावरणात निरोप घेतला.

हा मेळावा केवळ भेटीचा नव्हता, तर शालेय आयुष्याच्या अमूल्य क्षणांचा पुनर्जन्म होता. पंधरा वर्षांनंतर पुन्हा शाळा भरली – आणि त्या दिवसाने सर्वांच्या मनात बालपणाचं आकाश पुन्हा उजळून टाकलं.

# काकासाहेब नगर येथे विद्यार्थी मेळावा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : काकासाहेबनगर येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात माजी विद्यार्थी स्नेहबंध मेळावा आणि गुरु सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार भास्कर भगरे होते. या प्रसंगी उपस्थितांचे वतीने सरस्वती प्रतिमेचे पूजन करुन पुष्पहार अर्पण करण्यात आला. व्यासपीठावर खा. भगरे, विद्यालय प्राचार्य गोविंद कुशारे, पर्यवेक्षक एम. आर. लहारे, माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष माणिक कुशारे, प्रा. कुशारे, प्रा. इंगळे, प्रा. कडू, प्रा.संधान, प्रा.ढोली, प्रा. राऊत, प्रा. जाधव, अनुष्का आहेर आदी शिक्षक, शिक्षिका उपस्थित होते. वैभव कुशारे यांनी प्रास्ताविक केले.या वेळी सर्व शिक्षकांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.असून माणिक कुशारे यांनी विद्यार्थी मेळावा प्रसंगी विद्यालय गुणवत्ता, अडचणी, सहकार्य या बाबत मनोगत व्यक्त केले. प्राचार्य कुशारे यांनी विद्यालय प्रगतीबाबत विविध उपक्रम सांगितले. खा. भगरे यांनी मेळाव्यामध्ये माजी विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या प्रगतीसाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. खासदार निधीतून जे जे शक्य होईल, ती मदत विद्यालयाला नक्की करेल, असे आश्वासन आश्वासन यावेळी त्यांनी दिले. भाग्यश्री जाधव हिने सूत्रसंचालन केले. तर मिसळ पार्टीच्या माध्यमातून उपस्थितांना आस्वाद देण्यात आला. कार्यक्रमास विद्यालयातील सर्व माजी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर सेवक उपस्थित होते.

# भिवंडी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या स्वीकृत संचालकपदी मनोहर ठाकरे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधवः भिवंडी तालुक्यातील कळंबोली( पडघा) येथील भुमीपुत्र व शिवसेनेचे भिवंडी ग्रामीण विधानसभा संघटक मनोहर ठाकरे यांची भिवंडी कृषी उत्पन्न बाजार समिती स्वीकृत संचालक म्हणून निवड करण्यात आल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

पडघा परीसरात सर्वानां सुपरिचीत असलेले तालुक्यातील डोहळे गृप ग्रामपंचायतीचे माजी सरपंच, शेतकरी सहकारी भातगिरणी मर्यादित पडघा या संस्थेचे माजी उपसभापती व विद्यमान संचालक, कोंशीबी सेवा सहकारी सोसायटीचे माजी सभापती व विद्यमान संचालक अशी पदे मनोहर ठाकरे यांनी भुषविली असुन सहकार क्षेत्रातील त्यांचा असलेला गाढा अभ्यास लक्षात घेता कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सचीन पाटील उपसभापती मनेष म्हात्रे



सचीव प्रवीण गायकवाड यांच्या उपस्थीतीत व विद्यमान संचालक मंडळाच्या मान्यतेने मनोहर गजानन ठाकरे यांची स्वीकृत संचालक पदी गुरूवारी निवड करण्यात आली यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रकाश भोईर, जयदास भगत आदी संचालक उपस्थीत होते. ठाकरे यांची निवड झाल्याचे समजतात शिवसेना नेते प्रकाश पाटील, कुणबी सेना तालुका अध्यक्ष संतोष कथोरे, माजी सरपंच व शिवसेना जिल्हा परिषद गट पडघा सचीव शंशाक तांबोळी सह परिसरातील पदाधिकारी, नागरीक, कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

**साधं लग्न करा, बाप जिवंत ठेवा' या कवितेला श्रोत्यांची दाद..**

# विनायकदादा पाटील यांच्या स्मृतीदिनानिमित्त कवितांची ओघवती मैफल..

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : वनाधिपती विनायक दादा पाटील विचार मंच, निफाड यांच्या वतीने स्वर्गीय विनायकदादा पाटील यांच्या पाचव्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या आठवणींना उजाळा देणारी व संवेदनशील कवितांची मैफल आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमात कवितेच्या माध्यमातून समाजातील विदारक वास्तव, आत्महत्याग्रस्त शेतकरी, आणि बदलत्या सामाजिक मूल्यांवरील चिंतन व्यक्त करण्यात आले.




कार्यक्रमाची सुरवात स्वर्गीय विनायक दादा पाटील यांच्या प्रतिमा पुजनाने दिप प्रज्वलाने करण्यात आली. कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून आ.दिलीपराव बनकर, कृषी तज्ञ व साहित्यिक सचिन होळकर हे उपस्थित होते प्रास्ताविक वि.दा.व्यवहारे यांनी केले जेष्ठ कवी प्राचार्य लक्ष्मण महाडीक कवी प्रा. संदीप जगताप, विचारशील साहित्यिक विवेक उगलमुगले, आणि राजेंद्र सोमवंशी या मान्यवर कवींनी आपल्या काव्यरचनांद्वारे उपस्थितांचे मन भारावून टाकले.कवी संदीप जगताप व लक्ष्मण महाडीक यांनी सादर केलेल्या शेतकरी आत्महत्या या विषयावरील कवितांनी प्रेक्षकांना भावनिक केले. *पिक दुष्काळात जळतं, पुरात वाहतं, अवकाळी सडतं, गारपिटीत झोडपतं... तुच सांग वर्षाकाठी वा-वरात काय शिल्लक राहतं..? या आ-ोळींनी शेतकऱ्यांच्या व्यथांना आवाज दिला.त्याचबरोबर, *बँक्वेट हॉलमधील साखरपुडा, डिजेवरची मेहंदी, लाखोंचं प्रि-वेडिंग शूटिंग रक्त शोषून उधळपट्टी करणारे लग्न या सगळ्यांना फाटा देऊन साधं लग्न करण्याचा माझा पण नवा आहे, कारण मला माझा बाप जिवंत हवा आहे या आशयाच्या कवितेला विशेष दाद मिळाली.कवी राजेंद्र सोमवंशी यांनी फलटणमध्ये आत्महत्या केलेल्या तरुण डॉक्टर युवतीच्या दु:खद घटनेवर आधारित अशीच पणती एखादी विझून जाते या शीर्षकाची कविता सादर करताना प्रेक्षकांना अंतर्मुख केले. या कवितेतील कुठे चाललो आपण सारे, मनास प्रश्न विचारा या ओळींनी आत्मपरीक्षणाची हाक दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवी विवेक उगलमुगले यांनी करताना स्वर्गीय विनायकदादा पाटील यांच्या आठवणींना उजाळा दिला. त्यांनी एक हात मदतीचा या संकल्पनेचा उल्लेख करत, दादांच्या समाजकार्यातील प्रेरणादायी वाटचालीचा मागोवा घेतला.या प्रसंगी निफाड तालुक्याचे आमदार दिलीपराव बनकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राजेंद्र डोखळे, निफाडचे उपनगराध्यक्ष अनिल पाटील कुंदे, न्यायमुर्ती रानडे विद्याप्रसारक मंडळाचे रतन पाटील वडघुळे, माजी नगराध्यक्ष राजाभाऊ शेलार, अर्बन को-ऑप बँकेचे चेअरमन राजाभाऊ राठी, भाजपा जिल्हाध्यक्ष यतीन कदम, तसेच अँड. शांताराम बनकर, दुध संघाचे माजी चेअरमन शिवाजी ढेपले. अंजलीताई उगावकर, भारतीताई कापसे, डॉ. सिमा डेर्ले, मालती वाघावकर, रमेशचंद्र घुगे, वैकुंठ पाटील, भाऊसाहेब भवर, अँ इंद्रभान रायते, माणकेश्वर वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार, प्रमोद जडे, नगरसेवक सागर कुंदे, दिलीप कापसे, निफाड नागरी सह. बँकेचे चेअरमन अशोक पोफळिया, डॉ. उत्तमराव डेर्ले, अँड. रामनाथ शिंदे, लक्ष्मणराव निकम, बबनराव सानप, मधुकर राऊत, सुनील जाधव,संजय गाजरे,भास्कर पानगव्हाणे,गौरव पानगव्हाणे, रमेश जाधव, तनवीर राजे, सागर निकाळे, सुहास सुरळीकर, दत्तात्रेय डुकरे यांच्यासह निफाड तालुक्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते.शेवटी शिव-ाजीराजे ढेपले यांनी आभार मानले.

# सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू

**नागरिकांनी अनोळखी व्यक्तीची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस स्टेशनला द्यावी**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : देशात व राज्यात दहशतवादी कारवायांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू करण्यात आले आहे. हा आदेश २७ ऑक्टोबर २०२५ पासून पुढील ६० दिवस प्रभावी राहणार असून, याबाबतचे पत्रक अपर जिल्हादंडाधिकारी अभिजीत पाटील यांनी जारी केले आहे.

या आदेशानुसार, जिल्ह्यातील घरमालक, प्रॉपर्टी डिलर, वाहन विक्रेते, भाडेकरू सेवा पुरवठादार, तसेच धार्मिक स्थळांचे विश्वस्त व काळजीवाहक यांना खालील बाबींवर बंदी घालण्यात आली आहे:

**प्रतिबंधित कृत्ये**

१. नवीन अनोळखी व्यक्तींना निवासासाठी जागा उपलब्ध करून देताना पोलीस ठाण्याला माहिती न देणे

– अशा व्यक्तींची संपूर्ण माहिती संबंधित पोलीस ठाण्याला तात्काळ देणे बंधनकारक आहे.

२. जुने वाहन खरेदी-विक्री किंवा भाड्याने देताना अनोळखी व्यक्तींची माहिती पोलीस ठाण्याला न देणे

– वाहन व्यवहारात सहभागी होणाऱ्या प्रत्येक अनोळखी व्यक्तीची माहिती पोलीस ठाण्याला देणे आवश्यक आहे.

या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही पत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.